MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात



प्रतिनिधी । बीड

लाखो रुपये खर्च करून खासबाग येथे बायोगॅस प्रकल्प उभारण्यात आला होता. मात्र, सद्यस्थितीत त्याची अत्यंत दुर्दशा झाली असून, प्रकल्पाच्या पाण्याच्या हौदात मोठ्या प्रमाणावर मांगुर मासे वाढले आहेत. या माशांचे वजन सुमारे २० ते २५ किलो पर्यंत झाले असून, यामुळे परिसरातील लहान मुले आणि नागरिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे.खासबाग मैदानावर लहान मुले आणि युवक मोठ्या प्रमाणावर खेळण्यासाठी येतात. परंतु पाण्याचा हौद उघड्यावर असल्याने कोणतेही मूल किंवा नागरिक चुकून पाण्यात पडल्यास जीवितहानी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे तातडीने हा हौद बंद करून आवश्यक ती सुरक्षा उपाययोजना करणे गरजेचे आहे. याशिवाय, परिसरात काही समाजकंटकांनी अड्डा बनवला असून, येथे बसून गांजा व इतर अमली पदार्थांचे सेवन केल्याची माहिती मिळत आहे.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०२ अंक -१४६ सोमवार दि.१० फेब्रुवारी २०२५ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रू । पाने ४

Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-02 Issue -146 MONDAY DT.10 FEBRUARY 2025 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# अजितदादा पालकमंत्री म्हणून बीड नगरपरिषद सिओ निता अंधारे, गणेश पगारेच्या दोनशे कोटीच्या पापाचा पाढा वाचाच?


बीड नगरपरिषद मध्ये २०० कोटीचा घोटाळा सिओ निता अंधारे,गणेश पगारेनी नगर परिषद चुरूण खाल्ली. ?

बीड नगर परिषदेच्या भ्रष्टाचारात ऊन सिओ निता अंधारे नी खरेदी केलेली प्रॉपर्टी कुठे व कोणाच्या नावावर आहे पुढील अंकामध्ये?

सिओ निता अंधारे या महाराष्ट्र शासनाकडे नोकरीस लागल्या तेव्हा किती प्रॉपर्टी होती व आज ती कुठून व कशी आली याची सखोल चौकशी होणे गरजेचे?

पाणीपुरवठ्याच्या मनुष्यबळ पुरवणाऱ्या एजन्सी मध्ये गणेश पगारे सिओ निता अंधारे अंधारातून पार्टनरशिपमध्ये नागरिकांकडून चर्चा ला उधान ?

पुढील अंकांमध्ये सिओ निता अंधारे, गणेश पगारेचा प्रत्येक भ्रष्टाचार वाचकांसमोर लेखाजोखा मांडणार सविस्तर!








प्रतिनिधी । बीड

**नगर परिषद सिओ नीता अंधारे, गणेश पगारे यांनी राजकीय नेते महायुतीच्या सरकारमधील आमदार, नगरसेवक गुत्तेदार बीड जिल्ह्याचे शिवसेना राष्ट्रवादी, भाजपा, पदाधिकारी यांना हाताची धरत कोट्यावधी रुपयाचा निधी आणून कार्यकर्त्यांच्या माध्यमातून गुत्तेदाराच्या घशात घालत स्वत:चाही आर्थिक फायदा करूण घेतलेला आहे. नगरपरिषदे च्या सिओ नीता अंधारे यांनी शिवसेना भाजप आणि राष्ट्रवादी महायुतीच्या सरकारमधील तिन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना शंभर कोटी पेक्षा जास्त नगर परिषदेच्या माध्यमातून बोगस पद्धतीने देण्यात आलेला आहे. याचीही सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. त्यामुळे बीडचे पालकमंत्री व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे यांच्या नगरपरिषद मधील २०० कोटी पेक्षाही जास्त भ्रष्टाचारात प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी करणार आहे. बीड नगर परिषदेच्या सिओ नीता अंधारे कुठेकुठे प्रॉपर्टी खरेदी केली याचीही सखोल चौकशी होणे गरजेचे आहे?**

पाणीपुरवठा योजनेमध्ये कंत्राट पद्धतीने कामावर असलेल्या कामगारांकडून सुद्धा घेतली जाती टक्केवारी? स्वच्छता, पाणीपुरवठा, बांधकाम परवाना विद्युत घरकुल सह वेगवेगळ्या विभागात कोट्यावधी रुपयाचा घोटाळा कराणारा गणेश पगारे नगरपरिषदेच्या भ्रष्टाचाराचा मास्टर माईड.? बीड नगर परिषदेमध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या नोकरी विकत घेणारी टोळीगणेश पगारेच्या माध्यमातून सक्रीय? अनेक जणांना कामावर न येताच बीड नगरपरिषद देते पगार गणेश पगारे घेतो टक्केवारी?

दोनशे कोटी रुपयाचा भ्रष्टाचार बीड नगरपरिषदकडून स्वच्छता पाणीपुरवठा बांधकाम विद्युत वसुली पाणीपुरवठा वेगवेगळ्या विभागातून स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या खरेदी प्रकरण व बीड शहरातील रस्त्यावर रस्त्या नाल्यावर नाल्या रस्त्यावर रस्ते फक्त कागदावर दाखवून बीड नगरपरिषद लुटण्याचे काम आधारे पगारे कडून जोरदार सुरू ?

बीड नगर परिषद मुख्याधिकारी सिओ नीता अंधारे गणेश पगारे यांच्याकडून जनरल बिलं काढण्याचा धडाका.?

बीड शहरातील अनेक भागांमध्ये रस्त्यावर रस्ते नाल्यावर नाल्या अवैध बांधकाम परवाने स्वच्छता विभाग विद्युत विभाग पाणीपुरवठा कंत्राटी कामगार दाखवून नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारे यांच्याकडून बिल उचलण्याचा धडाका अंधारात काही सुरच ?अजित दादा पवार आपण पालकमंत्री म्हणून बीड नगरपरिषदेच्या मुख्याधीकारी निता अंधारे गणेश पगारेच्या अनागोधी कारभाराच्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी साठीचे समिती गठीत करणे गरजेचे?

बोगस बांधकामे अनाधिकृत नळ कनेक्शन आणि आता अतिक्रमणाच्या ताब्यात बीड नगरपरिषद अंधारात सर्व काही टक्केवारीत खेळ चालूच.?

बीडमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये बोगस बांधकाम चालू आहेत. संबंधित बांधकामा विना परमिशन मिळवून त्याच साठी वर्ष वर्ष प्रतीक्षा करावी लागते त्यामुळे लोक नगरपालिकेत जातच नाहीत. पण बांधकाम करून घेतात कायद्याची भीती न राहता बीड नगर परिषदेमध्ये अनेक बांधकाम बीड शहरांमध्ये डोके वर काढले. आहेत नगरपरिषदेचे कर्मचारी फिरकत नाहीत जर कोणी बांधकामावर आले तर चिरी मेरी देऊन आर्थिक तडजोडी करून संबंधित कर्मचारी हे हातात हात मिळवणी करत परत येतात परवानगी न घेतांना अधिकृत नळ कनेक्शन घेण्यात आले याचा सपाटा सध्या बीड शहरांमध्ये चालू आहे अतिक्रमणधारकांचा विळखा हा बीड शहरांमध्ये सिओ नीता अंधारे यांच्या कार्यकाळामध्ये टक्केवारीत अंधार होत असताना विळख्यात जोर धरू लागला आहे अतिक्रमानाचा विळखा बीड नगरपालिकेत कुठलीही यंत्रणा म्हणून शिल्लक राहिलेली नाही. मुख्याधिकारी निता अंधारे कधीच बाहेर फिरून या गंभीर बाबीकडे लक्ष देत नाहीत. नगरपरिषद मध्ये नागरिक चकरा मारतात नगर परिषद कार्यालयात अधिकारी बसत नाहीत कर्मचारी जागेवर नसतात अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. परंतु नीता अंधारे ह्या त्यांच्या शासकीय निवासस्थान नगर रोड पाण्यात टाकीजवळ २४ तास संबंधित गुत्तेदार व कर्मचारी यांच्यासाठी उपलब्ध आहेत. तर त्या मोजक्या लोकांच्या वरती त्या विश्वात दाखवून बोलत आहेत. अशी ही चर्चा बीड शहरामध्ये जोर धरू लागली आहे.

बीड ।प्रतिनिधी

बीड नगर परिषदेमध्ये जेव्हापासून प्रशासक नियुक्ती केले आहे. व मुख्धिकारी निता अंधारे यांच्या कार्यकाळामध्ये २०० कोटी रुपये पेक्षाही जास्त पैसा बीड नगर परिषदेमधून गुत्तेदारांच्या राजकीय नेत्यांच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून निता अंधारे यांनी भ्रष्टाचार केलेला आहे. ज्या ठिकाणी अनेकदा एकाच वेळी फक्त कागदावर रस्ते व बीड शहरातील विकास झालेला आहेत. बांधकाम विभाग पाणीपुरवठा स्वच्छता विद्युत विभाग सफाई कामगार यांच्या नोकऱ्यांची खरेदी विक्री करणे नगरपरिषदेच्या माध्यमातून गणेश पगारे नावाचा एक दलाल माणूस बीड नगर परिषद चुरून खाऊ लागला आहे. गणेश पगारे हा बीड नगर परिषदेमधला सर्वात मोठा भ्रष्टाचाराचा महामेरू म्हणून मिरवत आहे. गणेश पगारेच्या अनेक तक्रार असताना पुन्हा गणेश पगारीला बीडची नगर परिषद चुरूण खाण्यासाठी देण्यात आली आहे गणेश पगारे व नीता अंधारे यांनी सुमारे २०० कोटी पेक्षा जास्त घोटाळा केलेला आहे नीता अंधारे यांनी अनेक ठिकाणी प्रॉपर्टी खरेदी केलेली आहे का या बीड नगर परिषदेतील रुपयाच्या खर्चाची व भ्रष्टाचाराची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे संबंधित प्रकरणाची चौकशी व्हावी म्हणून नागरिकांचा चर्चा होत आहे. बीड नगरपरिषदेचा पदभार सिओ नीता अंधारे नी घेतल्या पासून बीड शहरातील अनेक भागात वेगवेगळ्या विभागातील शासकीय कर म्हणून नगरपरिषद ला वसुल झालेली भारली जाणारी रक्कम ही नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी कोणाच्या घशात घातली हे चित्र स्पष्ट करणे गरजेचे आहे. बांधकाम परवाने असतील किंवा अवैध बांधकाम वाचविण्यासाठी असेल यासाठी टक्केवारी मिळवत नीता अंधारे या बीड जिल्ह्यातील महायुती सरकार मधील खासदार आमदार मंत्री यांचे व एका आष्टीच्या आमदार यांचे पाठबळावर करत आहे सिओ नीता अंधारे यांनी २०० कोटी रुपयांची अफरातफर बीड नगर परिषदेमध्ये योग्य पद्धतीने केलेली आहे. निता अंधारे यांनी मात्र एखाद्या चित्रपटाला लाजवतील असे राजकीय नेत्यांना लाजवेल अशा पद्धतीने भ्रष्टाचार केलेला आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी हि बीडचे पालकमंत्री व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून चौकशी होणे गरजेचे आहे. पुढील अंकामध्ये नीता अंधारे यांच्या पापाचा पाढा वाचून जनतेसमोर व अजित दादा पवार यांच्यासमोर येणार असल्याने बीड शहरातील नागरिकांमध्ये आता याबद्दल उत्सुकता लाभलेली आहे. बीड नगर परिषदेमध्ये नीता अंधारे गणेश पगारेनी त्याच्या कार्यकाळातील बीड नगर परिषद हद्दीतील शहरातील नागरिक त्रस्त झालेले आहेत. आणि बीड नगर परिषद तील २०० कोटीचा घोटाळा केल्याची चर्चा बीड शहरातील नागरिकांमध्ये ऐकायला मिळत आहे.?

## दारव्हा तालुक्यात शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदलांची सुरुवात – श्रीमती क्रांती खेडकर यांची गट शिक्षणाधिकारी पदी नियुक्ती

प्रतिनिधी । वडवणी

दारव्हा तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण बदल घडवत, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद यवतमाळच्या आदेशानुसार श्रीमती क्रांती महादेवराव खेडकर यांची गट शिक्षणाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे तालुक्यातील शैक्षणिक व्यवस्थापन अधिक कार्यक्षम आणि शिस्तबद्ध होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. पूर्वाधिकारी विलास जाधव यांचे उल्लेखनीय योगदान



याआधी श्री विलास जाधव यांनी सहायक गट विकास अधिकारी (दिग्रस) पदावर पदोन्नती मिळूनही प्रशासकीय सोयीसाठी दारव्हा गट शिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार कार्यक्षमतेने सांभाळला होता. त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा तालुक्यात मोठा सकारात्मक प्रभाव राहिला आहे.

श्रीमती खेडकर यांची शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कारकीर्द

श्रीमती खेडकर यांनी ७ जून २०२४ रोजी विस्तार अधिकारी (शिक्षण) म्हणून दारव्हा तालुक्यात कार्यभार स्वीकारला होता. आपल्या समर्पण, कार्यक्षमता आणि शिस्तप्रिय स्वभावामुळे त्यांनी कमी कालावधीतच शिक्षकांचा व वरिष्ठ प्रशासनाचा विश्वास संपादन केला. त्यांच्या नेतृत्वाखाली विविध शैक्षणिक उपक्रम प्रभावीपणे राबवले गेले.

श्रीमती खेडकर यांचा शैक्षणिक व्यवस्थापनातील सकारात्मक दृष्टिकोन व उत्तम नेतृत्वदक्षता दारव्हा तालुक्यासाठी निश्चितच लाभदायक ठरेल. त्यांचे शिक्षकांशी मैत्रीपूर्ण संवाद आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी घेतलेले ठोस निर्णय यामुळे तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडतील, अशी अपेक्षा आहे.

शुभेच्छांचा वर्षाव श्रीमती खेडकर यांच्या या नियुक्तीबद्दल तालुक्यात सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत असून शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. त्यांचे पुढील कार्य यशस्वी होण्यासाठी सर्वांनी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

## व्हॉईस ऑफ मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी जालिंदर धांडे

### जिल्हा पदाधिकार्यांच्या बैठकीत झाला निर्णय

प्रतिनिधी । बीड

व्हॉईस ऑफ मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दैनिक प्रारंभचे संपादक जालिंदर धांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. रविवारी दुपारी या संदर्भात बीड येथे एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांची ऑनलाईन उपस्थिती होती.




व्हॉईस ऑफ मीडिया ही संघटना पत्रकारांच्या प्रश्नावर गेल्या पाच वर्षांपासून देशभरात काम करते. मागील तीन वर्षांपासून बीड जिल्हाध्यक्ष म्हणून बालाजी मारगुडे यांनी काम पाहिले. नविन होतकरू पत्रकारांना जिल्हाध्यक्ष पदावर संधी मिळावी. पत्रकारांमध्ये सतत नविन नेतृत्व तयार व्हावे यासाठी मारगुडे यांनी जालिंदर धांडे यांचे नाव जिल्हाध्यक्षपदासाठी सुचविले होते. त्यास पत्रकार सोमनाथ खताळ, आनंद डोंगरे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर पत्रकार दिनेश लिंबेकर, सुनील यादव, अमोल मुळे, ज्ञानेश्वर वायबसे, केशव कदम, शुभम खाडे, डॉ.गणेश ढवळे, धनंजय जोगडे आदींनी धांडेंच्या नावाला सहमती दर्शविली.

# बीड जिल्हा प्रशासन जनतेच्या जीवाशी तर खेळत नाही ना?




## प्लास्टिक किंवा पेपर कप मध्ये चहा पिण्याचे हे दुष्परिणाम माहीत आहेत का ?

काही पेपर च्या प्रतिनिधी आणि काही समाजसेवकांनी वारंवार सांगून ही जिल्हा प्रशासन झोपेतून उठत नाही

जर तुम्हालाही बाहेर खाण्या-पिण्याची आवड असेल तर तुम्ही पेपर किंवा प्लास्टिकच्या कपमधूही पदार्थांचे सेवन केले असेलच. एखादा कॅफे असो किंवा कोणताही स्टॉल बऱ्याच ठिकाणी पेपर किंवा प्लास्टिक कप्सचा वापर केला जातोच. त्यामध्ये द्रव पदार्थ पिणे सोपं असतं, त्यामुळे त्याचा दररोज मोठ्या प्रमाणात वापर केला जातो.पण सहज वापरल्या जाणाऱ्या गोष्टींचा आपल्या आरोग्यावर कसा परिणाम होतो याचा तुम्ही कधी विचार केला आहे का ? ते दीर्घकाळ वापरणे तुमच्यासाठी सुरक्षित आहे का? प्लास्टिक किंवा पेपर कपमध्ये चहा प्यायल्याने आरोग्यावर कसा परिणाम होतो, ते जाणून घेऊया.

प्लास्टिक कपमध्ये चहा पिणं नुकसानकारक असतं का ?

प्लॅस्टिकच्या कपमध्ये चहा किंवा कोणतेही गरम पेय प्यायल्याने प्लास्टिकचे कण त्यात विरघळू लागतात. काही प्लास्टिकचे कप बिस्फेनॉल - (इझ-) किंवा हिंहर-श्रींशी सारख्या हानिकारक रसायनांचा वापर करून तयार केले जातात, जे पेयांमध्ये वितळतात आणि थेट शरीरात जाऊ शकतात. शरीरात प्रवेश झाल्यास आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. यामुळे शरीराच्या अनेक भागांवर विपरीत परिणाम दिसून येतात.

पेपर कपमध्ये चहा पिणं नुकसानकारक असतं का ?

प्लास्टिकमुळे होणारी हानी टाळण्यासाठी बहुतेक लोक पेपर कप वापरतात. पण पेपर कप वापरणेही आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. पेपर कप तयार करण्यासाठी, प्लास्टिक किंवा मेणाचे कोटिंग केले जाते. या पेपर कपमध्ये गरम पेय किंवा पदार्थ टाकल्यास त्यामध्ये रसायने मिसळू शकतात. त्यामुळे याच्या सेवनाने हे विषारी पदार्थ थेट शरीरात जाऊ शकतात.

# धारूर प्रिमियर लिग क्रिकेट स्पर्धेचे थाटात व उत्साहात उदघाटन दहा संघाचा सहभाग बक्षिसांचा वर्षाव

**प्रतिनिधी** । धारूर

जय हिंद क्रिकेट क्लब चे वतीने धारूर प्रिमियर लिग चे आयोजन करण्यात आले असून दहा संघाणी या मध्ये भाग घेतला असून सघ व खेळाडु वर बक्षीसाचा वर्षाव या स्पर्धेत करण्यात आला असून या स्पर्धेचे उदघाटन माजी नगराध्यक्ष डा स्वरुपसिंह हजारी यांचे हस्ते पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांचे व मान्यवराचे उपस्थीतीत थाटात व उत्साहात करण्यात आले या स्पर्धे मुळे युवा खेळाडूना प्रोत्साहन मिळणार आहे.

धारुर शहरात गेल्या बारा वर्षांपासून आंतरराष्ट्रीय आयपीएलच्या धर्तीवर दहा



संघात डिपीएल स्पर्धा जयहिंद क्रिकेट क्लबच्या वतीने खेळवल्या जातात. यावर्षीही धारुर प्रिमियर लिग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असुन यंदा ५५५५५ पंचाव्वन हजार पाचशे पंचावन्न रुपयांचे प्रथम पारितोषिक शाम सिरसट, भाग्यश्री कंन्ट्रक्शन कंपनी यांच्याकडून तर द्वितीय क्रमांकाचे पारिभाषिक ३३३३३ तेहतीस हजार तीनशे तेहतीस रुपये अकरम जरगर, महालक्ष्मी स्टोन क्रेशर यांच्याकडून देण्यात येत आहे. या स्पर्धेचे उद्घाटन दि.९ रविवार रोजी माजी नगराध्यक्ष डॉ. स्वरुपसिंह हजारी व सहाय्यक पोलिस निरिक्षक देविदास वाघमोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष नितिन शिनगारे, ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन, समाजसेवक सादेक इनामदार, ड. परमेश्वर शिनगारे भाजपाचे अड मोहन भोसले पत्रकार सय्यद शाकेर, सुनिल कावळे, ईश्वर खामकर सचिन थोरार यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी स.पो.नि. वाघमोडे यांनी खेळाडूंनी खेळाडूवृत्तीचे प्रदर्शन करुन समाजात दुही निर्माण होवून शांतता भंग होण्यास कारणीभूत ठरणारे कृत्य करु नये असे आवाहन केले. यावेळी संयोजक रोहित हजारी, संतोष सद्दीवाल, अनुप दिख्खत, रिंकू भोसले यांच्यासह ज्येष्ठ खेळाडू नितिन शुक्ला, सय्यद शाकेर, विरेंद्र अवस्थी, उमेश रहेकवाल, संतोष सद्दीवाल नाना गायसमुद्रे योगेश अंधारे, आदींची उपस्थिती होती.

# धारूर शहरात शिष्यवृत्ती परीक्षा सुरळीत, पाचवीच्या २०६ तर आठवीच्या ११९ विद्यार्थ्यांनी दिली परीक्षा

**प्रतिनिधी** । धारूर

धारूर शहरांमध्ये आज पाचवी व आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा संपन्न झाली. यामध्ये पाचवीच्या २०६ तर आठवीच्या ११९ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत पाचवी व आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते धारूर शहरांमध्ये जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत इयत्ता पाचवीची तर हुतात्मा पापसिंह माध्यमिक विद्यालयात इयत्ता आठवीची शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. यात जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत पाचवीच्या २०८ पैकी २०६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली तर हुतात्मा पापा सिंह माध्यमिक विद्यालयामध्ये इयत्ता




आठवीच्या १२२ पैकी ११९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत केंद्रप्रमुख म्हणून शांतिनाथ मुंडे यांनी काम पाहिले तर त्यांना सहकार्य केशव डोंगरे, विकास आडागळे, हनुमंत मंत्रे इत्यादी शिक्षकांनी केले. तर हुतात्मा पापासिंह माध्यमिक विद्यालयात केंद्रप्रमुख म्हणून जालिंदर मुंडे यांनी काम पाहिले तर त्यांना सहकार्य आत्माराम मुंडे , आदर्शशिक्षक तानाजी लासुने, पंचाळ सर, एस आर नाईकवाडे ,कुलकर्णी मॅडम इत्यादींनी सहकार्य केले.

शिष्यवृत्ती परीक्षेसाठी भरारी पथक स्थापन करण्यात आले होते या भरारी पथकाचे प्रमुख धारूरचे केंद्रप्रमुख सय्यद हकीम यांनी काम पाहिले. अतिशय उत्कृष्ट व योग्य नियोजनात परीक्षा झाल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले आहे परीक्षा केंद्रास पत्रकार बांधवांनी भेट देऊन पाहणी करत परीक्षा विभागाचे कौतुक केले.

# राजमा (घेवडा) खा आणि आरोग्य तंदुरुस्थ ठेवा

राजमा खाण्याचे शौकीन आपल्याला अनेक ठिकाणी मिळतील. राजमा पोषक द्रव्यांनी परिपूर्ण आहे. त्यात सर्वाधिक फायबर आणि प्रथिने असतात. याशिवाय लोह, तांबे, फोलेट, फॉस्फरस, मॅग्नेशियम, कॅल्शियम, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के यासारखे पौष्टिक पदार्थ आढळतात. एका अभ्यासानुसार १०० ग्रॅम राजमामध्ये सुमारे ३५० कॅलरी आणि २४ ग्रॅम प्रथिने मिळतात.

राजमा खाल्ल्याने आपल्याला भरपूर प्रमाणावर ऊर्जा मिळते. कारण राजमामध्ये भरपूर प्रमाणात लोह आढळून येते. जे शरीरातील चयापचय आणि ऊर्जा वाढवण्यासाठी खूप उपयुक्त आहे. राजमा खाल्ल्याने शरीरातील ऑक्सिजनचा प्रवाह सुरळीत होतो. राजमामध्ये गुड कॅलरीज असतात. जे आपले वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत



करतात. दुपारच्या जेवणाला आपण राजमा सुपचे सेवन करू शकता. यातील पोषक तत्वे शरीराला योग्य कॅलरीज देते. किडनी बीन्समध्ये असलेले फायबर शरीरातील चयापचय व्यवस्थित ठेवते. राजमा कार्बोहायड्रेट्स कमी करते, ज्यामुळे रक्तातील साखर कमी होते. राजमा शरीरातील कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. किडनी बीन्समध्ये असलेले फायबर वजन नियंत्रित ठेवते, ज्यामुळे कोलेस्ट्रॉल कमी होते. राजमा खाल्ल्याने मेंदू तल्लख होतो यासह स्मरणशक्तीही वाढते. यामध्ये असलेले व्हिटॅमिन के मेंदूसाठी खूप फायदेशीर आहे. याशिवाय यामध्ये असलेले मॅग्नेशियम देखील मायग्रेनची समस्या दूर करते. आठवड्यातून एकदा राजमा खाल्ल्याने ही समस्या दूर होते. राजमाचे सेवन तुमच्या केस आणि त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन-सी मुबलक प्रमाणात आढळून येते जे केसांची योग्य निगा राखतात. व्हिटॅमिन-सी देखील आपल्या त्वचेसाठी उत्तम आहे, याने त्वचा तजेलदार बनते. विटॅमिन के ची पर्याप्त मात्रा ब्रेनसोबत नर्वस सिस्टिमसाठीदेखील फायदेशीर असते. राजमामध्ये उपलब्ध असलेली थियामिनची मात्रा मेंदूची क्षमता वाढवण्यास मदत करते. यामुळे अल्जायमर सारखा आजार होण्यापासून बचाव होतो. प्रथिने, फायबरने समृद्ध असलेला राजमा रक्तातील साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत करतो. राजमा खाल्ल्यानंतर राजमा खाल्ल्याने टाइप -२ मधुमेहाचा धोका कमी होतो. किडनी बीन्समध्ये असलेले फायबर शरीरातील चयापचय व्यवस्थित ठेवते. राजमा कार्बोहायड्रेट्स कमी करते, ज्यामुळे रक्तातील साखर कमी होते. राजमा खाल्ल्याने आपल्याला भरपूर प्रमाणावर ऊर्जा मिळते. कारण राजमामध्ये भरपूर प्रमाणात लोह आढळून येते. जे शरीरातील चयापचय आणि ऊर्जा वाढवण्यासाठी खूप उपयुक्त आहे. राजमा खाल्ल्याने शरीरातील ऑक्सिजनचा प्रवाह सुरळीत होतो.

संकलन -
**दिनकर जाधव**
७०८३२७२७७७

# सुगंधकुट्टी बौद्ध विहार येथे रंगला यशस्वीतांचा सत्कार

## इंजि. राजू जगतकर, आरती बोकरे,आनंद बनसोडे यांच्या कर्तुत्वाचा सत्कार

**प्रतिनिधी** । परळी

सुगंधकुटी बौद्धविहार येथे दर रविवारी बुद्ध वंदेचा कार्यक्रम आयोजित केला जातो.त्या दिनाचे औचित्य साधून परळी शहरातील भिमनगर,जगतकर गल्ली येथील सुगंध कुटी बुद्ध विहार येथे परळीची भूमिपुत्र असलेले इंजि.राजू जगतकर, आरती बोकरे व आनंद बनसोडे या मान्यवरांचा दि.९/ २/ २५ रोजी येथील सुगंधकुट्टी बुद्ध विहार येथे सत्कार करण्यात आला. सुरुवातीला बुद्ध वंदना घेऊन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजा करून भिमनगर येथील कु.आरती बोकरे हिची अन्न व औषध प्रशासन अधिकारी पदी नियुक्ती झाल्याबद्दल तसेच आनंद ज्ञानोबा बनसोडे यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक



पदी नियुक्ती झाल्याबद्दल व इंजि.राजू श्रावण जगतकर यांची दुबई येथे बुलेटट्रेनच्या ऑपरेशन मॅनेजर पदी भारत देशातून निवड झाल्या बद्दल शाल पुष्पगुच्छ देऊन हृदय सत्कार करण्यात आला.

सत्कार ला उत्तर देताना

कु.आरती बोकरे हिने या पदाचा समाजाच्या हितासाठी उपयोग करणार आहे. माझ्यासारखे यशस्वी विद्यार्थी आपल्या भागात घडविण्यासाठी मी या भागातील मुलांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यास कधीही तयार आहे. तर इंजि. राजू जगतकर यांनी उपस्थित पालकांना समजावून सांगितले की विद्यार्थी कुठल्याही कुठल्याही वळणावर यश की खेचून आणता येते परंतु त्यात सातत्य असणे गरजेचे आहे. यासाठी लवकरच वेगवेगळे शिबिरे व तज्ञ व्यक्तींची मार्गदर्शन व्याख्याने आपण या भागात ठेवणार आहोत असे सांगितले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी कु.आरती बोकरे करे हिचा सत्कार प्रा.डॉ.यशश्री बालासाहेब जगतकर, रंभा बालासाहेब जगतकर, ज्योती सारनाथ जगतकर, व लिंबूबाई वसंत बनसोडे, यांच्या हस्ते तर आनंद बनसोडे यांचा विलास आदोडे, उत्तम समुद्रे, वसंत बनसोडे, संजय जगतकर, राजेभाऊ जगतकर,आदीच्या हस्ते करण्यात आला तर इंजि.राजू श्रावण जगतकर यांचा सत्कार सोपान ताटे, मिलिंद बनसोडे, शंकरराव साळवे, अशोक जगतकर,एच.टी. वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बौद्धाचार्य सिद्धार्थ जगतकर यांनी तर आभार प्रदर्शन अनिल मस्के यांनी मानले या कार्यक्रमास संपादक बालासाहेब सोपानराव जगतकर, श्रावणराव जगतकर, संपादक बालाजी जगतकर, प्रा. संघपाल समुद्र,प्रा.विलास रोडे, माजी मुख्याध्यापक विनायकराव गडदे, भानुदास जंगले, विकास जगतकर, यश जंगले,दीपक शिरसाट, विलास केदारे, दर्शन ताटे, राज जगतकर किरण तरकसे,अवचारे सुनील, गोदाम,कुणाल गोदाम, संकेत बनसोडे, अरविंद बनसोडे वैजनाथ बनसोडे, सुरेश घाडगे लक्ष्मण जगतकर,अपर्णा बनसोडे,वंदना जंगले, इत्यादी सह बालक, बालिका,महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वाचन संस्काराचा पाया आहे - वंदना बोकील

**प्रतिनिधी** । अंबाजोगाई

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर,आणि योगेश्वरी शिक्षण संस्था संचालित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाचा नाट्यशास्त्र विभाग यांच्या वतीने नरहर कुरुंदकर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती त्या व्याख्यानमालेत डॉ वंदना बोकील बोलत होत्या. व्याख्यानमालेच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्षचंद्रशेखर बर्दापूरकर हे उपस्थित होते. प्रमुख वक्तृया म्हणून ज्येष्ठ साहित्यिक संपादिका डॉ वंदना बोकील म्हणाल्या की काय आणि कसे वाचावे या विषयावर साहित्यातील उत्तम संदर्भ देत मराठी साहित्याचा आढावा घेतला विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड ही नरहर करून प्रमाणे असली पाहिजे असे त्यांनी नमूद करून नरहर कुरूंदकर यांच्या प्रस्तावना, त्यांचे साहित्य या विषयावर प्रकाश टाकत वाचन संस्कृती ही वृद्धिंगत झाली पाहिजे.यावेळी बोलताना मातृभाषेचे संस्कार हे श्रवणातून अधिक होत असतात त्यामुळे वाचकांनी अदिश श्रवण केले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी नरहर कुरुंदकर यांच्या लेखन साहित्याची वैशिष्ट्ये सांगितली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर.थारकर यांनी नरहर कुरुंदकर यांच्या प्रस्तावनांची वैशिष्ट्ये नमूद केली. तर कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात व्याख्यानमालेच्या संयोजिका डॉ.संपदा कुलकर्णी यांनी नरहर कुरुंदकर यांच्या समीक्षेची वैशिष्ट्ये सांगून कुरूंकरांचा वाचन व्यासंग आणि नरहर कुरुंदकर यांचा चरित्र परिचय उपस्थितांना करून दिला. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आले होतेकुरूंदकरांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला . यो.शि.सं.चे उपाध्यक्ष गणपत व्यास यांच्यासह स्वा.रा.ती. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षिका शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ द्यावी

## सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयात सोयाबीन उधळत लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी** । बीड

बीड जिल्ह्यातील सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रें बंद झाल्याने २३ हजार शेतकऱ्यांचे सोयाबीन खरेदीविना घरात पडुन असुन शेतकऱ्यांना खुल्या बाजारात सोयाबीन विकावे लागुन प्रति क्विंटल १००० रूपये आर्थिक नुकसान टाळण्यासाठी हमीभाव खरेदी केंद्रांना महिनाभर मुदतवाढ देण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१० सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्रांना मुदतवाढ द्यावी घोषणाबाजी करत सोयाबीन उधळुन सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणाबद्दल तिव्र संताप व्यक्त केला.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार,पांडुरंग हराळे, बप्पासाहेब पवार, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे

आदी सहभागी होते. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पणनमंत्री जयकुमार गोरे, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण्यात आले. बीड जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी ४४ हजार ७४४ शेतकऱ्यांनी नाफेडकडे सोयाबीन खरेदीसाठी १ आक्टोबर ते १५ सप्टेंबर पर्यंत ऑनलाईन अर्ज केले होते.त्यानंतर १५ आक्टोबर २०२४ पासुन नाफेडच्या वतीने जिल्ह्यातील ३० केंद्रावर ६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत




जिल्ह्यातील २० हजार ९६९ शेतकऱ्यांची ५ लाख ९४ हजार २०१ क्विंटल सोयाबीन खरेदी करून केंद्र बंद करण्यात आले.मात्र नोंदणी केलेले २३ हजार ७७५ शेतकरी वंचित राहिले असल्याने आजही त्यांच्या घरात सोयाबीन पडुन आहे.हमीभाव खरेदी केंद्रे बंद झाल्याने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १००० रुपये आर्थिक नुकसान ; शेतकऱ्यांची बिनबोभाट लुट शासनाने हमीभाव खरेदी केंद्रे बंद केल्याने आता शेतकऱ्यांना हे सोयाबीन खुल्या बाजारात बेभावाने विकावे लागणार आहे.

शासनाने यावर्षी सोयाबीनला ४८९२ रुपये हमीभाव दिला होता. खर्च आणि उत्पन्नाचे गणित जुळवताना हा भाव शेतकऱ्यांना परवडणारा नाही.मात्र पर्याय नसल्याने शेतकरी शासनाच्या खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्री करत होते.आता हे खरेदी केंद्रेही बंद केल्याने शेतकऱ्यांना खुल्या बाजारात ३८०० ते ४००० रूपये प्रति क्विंटल दराने बेभाव विक्री करावी लागत आहे. वास्तविक पाहता आधारभूत धान्य खरेदी किंमतीपेक्षा कमी दराने सोयाबीन अथवा ईतर कोणताही शेतीमाल खरेदी करणं कायद्याने गुन्हा आहे.परंतु याची पडताळणी करणारी यंत्रणाच नसल्याने शेतकऱ्यांची बिनबोभाट लुट सुरू आहे.

अर्थमंत्री निर्मला सितारामन म्हणतात विकासाचे पहिले इंजिन कृषी क्षेत्र आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतातकृषी क्षेत्रासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नेहमीप्रमाणे म्हणतात महाराष्ट्राचा दुष्काळ संपवणार कृषी मंत्री शेतकऱ्यांना ड्रोनचा शेतीमध्ये वापर करण्याचा सल्ला देतात मात्र दुसरीकडे शेतकरी विरोधी धोरणे राबवतात. एकंदरीत सरकारचा हा दुटप्पीपणा असुन यांचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहेत.याबद्दल शेतकऱ्यांमध्ये तिव्र नाराजी आहे.

# राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी शैलेश तोष्णीवाल

## आ. विजयसिंह पंडित यांनी केली घोषणा

**प्रतिनिधी ।** गेवराई

आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सालाबादाप्रमाणे यावर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे थाटात आयोजन करण्यात येत असून या सोहळ्याची कार्यकारणी आ. विजयसिंह पंडित यांनी जाहीर केली असून कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी शैलेश तोष्णीवाल तर कार्याध्यक्षपदी संदिप मडके यांची निवड करण्यात आली आहे. सर्व



पदाधिकारी व सदस्यांचे स्वागत आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे

राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा नूतन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्षपदी संदिप मडके सहकार्याध्यक्षप्पदी संतोष सुतार, उपाध्यक्षपदी अँड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल सचिवपदी राहुल मस्के, सहसचिवपदी शहादेव निकम, कोषाध्यक्षपदी पप्पू पठाण, सह कोषाध्यक्षपदी रणजित घुंबार्डे यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचे आ. विजयसिंह पंडित यांनी सत्कार करुन अभिनंदन केले आहे.

# १० वी, १२ वी परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी

**प्रतिनिधी ।** बीड

जिल्ह्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा माहे फेब्रुवारी, मार्च, २०२५ मध्ये होत असून परीक्षेमध्ये गैरप्रकार टाळण्यासाठी, परीक्षा कॉपीमुक्त करण्याकरिता तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी अविनाश पाठक यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात दि. ११ फेब्रुवारी, २०२५ ते १८ मार्च, २०२५ या कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहेत.

परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असतांना परीक्ष न देणारे विद्याथी आणि इतर काही घटक परिक्षा केद्राच्या परिसरात परिक्षा चालू असतांना उपद्रव करित असतात. परिक्षा चालू असतांना कॉपी देण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेराक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दूरूपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता परिक्षा देणा-य विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी ,कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये इयत्ता १२ व दहावीच्या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी व परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात फौज्दारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ ( २ ) करण्यात आले आहे.

या परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी केला असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरापर्यंत शासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी यांच्या व्यवतिरिक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास, फोटोकॉपी, ई-मेल, इंटरनेट सुविधा, इतर दळणवळण, संदेश वहन साधने तसेच कोणत्याही व्यक्तीजवळ मोबाईल, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप, संगणक बाळगण्यास, एस.टी.डी,आय.एस.डी मशिन, ध्वनीक्षेपक वाजविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

शासकीय परिक्षेसंबधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या १०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम तसेच अंत्ययात्रा यासाठी लागू राहणार नाहीत

# सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला आ.संदीप क्षीरसागर आले धावून!

## हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढ द्यावी

**प्रतिनिधी ।** बीड

बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऐनवेळी आ.संदीप क्षीरसागर धावून आले आहेत. मतदारसंघासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या खरेदीसाठी नाफेडकडे नावनोंदणी केली, मात्र मुदत संपल्यानंतर आता ही खरेदी कधी होणार? असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असून शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढी द्यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पणण मंत्री जयकुमार रावल व राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे. याबाबत लेखी पत्रही आ.क्षीरसागर यांनी दिले आहे.

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर अन् त्यांच्या संवादातून लक्षात आलेल्या समस्या लक्षात घेवून आ.संदीप क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या भावना पत्र लिहून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यापर्यंत पोहचवल्या आहेत. हंगाम २०२४-२५ मधील हमीभावाने सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिल्यास सर्व शेतकऱ्यांकडील सोयाबीन खरेदी होवू शकते याकडे लक्ष वेधत आ.संदीप क्षीरसागर यांनी याबाबतच्या पत्रात नमूद केले आहे की, केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भीय धोरणानुसार सुरूवातीला दि.३१ जानेवारी २०२५ पर्यंत त्यानंतर दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सोयाबीन खरेदीच्या बाबतीत मुदतवाढ देण्यात आली होती; परंतु बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील नोंदणीधारक शेतकरी ४४ हजार ७०० च्या वर आहेत. त्यापैकी दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत किमान २१ हजार शेतकरी बांधवांककडून सोयाबीन खरेदी झालेली आहे.



बीड मतदार संघासह जिल्ह्यातील किमान ४० टक्क्याच्यावर शेतकरी बांधवांची खरेदी अजूनही शिल्लक आहे. त्यामुळेच या सर्व शेतकरी बांधवांच्या सोयाबीनची खरेदी करण्यासाठी मुदतवाढ द्यावी व त्यातून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी महत्वाची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. निवेदनातच्या प्रती राज्याचे मुख्य सचिव व अवर सचिवांनाही पाठवण्यात आल्या आहेत. आ.संदीप क्षीरसागर यांनी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न राज्य शासनापर्यंत पोहचवले आहेत.



# वाळू ने भरलेला ट्रॅक्टर तलवाडा पोलीसानी पकडले

**प्रतिनिधी ।** तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत गोदावरी नदी पात्रातून काही ट्रॅक्टर चोरट्या पद्धतीने वाळूची वाहतूक करत असताना तलवाडा पोलिसांना याची माहिती मिळताच अंतरवाली या ठिकाणी एक भरलेला वाळूचे ट्रॅक्टर आढळून आले असून त्यांच्या वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे


याबाबत सविस्तर माहिती अशी की, बीड जिल्ह्याला पोलीस अधीक्षक म्हणून नवनीत कोवत यांनी चार्ज घेतल्यापासून अवैध धंद्यावर पोलीस बेधडक कारवाई करत असून त्यामुळे तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीत गोदावरी पात्र येत असून या ठिकाणी अक्षरश गोदावरी नदीची चाळणी केली असून अशी चोरटी वाहतूक आंतरवाली येते छत्रपती शिवाजी महाराज चौक वाळूची करत असताना आढळून आले असून असा एकूण अंदाजे अकरा लाख रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला असून ही कारवाई फिर्यादी विठ्ठल श्रीराम चव्हाण यांच्या फिर्यादीवरून आरोपी शुभम सुरेश पंडित राहणार दैठण तालुका गेवराई तर दुसरी कारवाई नारायण श्रीकृष्ण काकडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी करण लक्ष्मण लेंडाळ यांच्यावर गुन्हा दाखल झाला असून त्यांच्याकडून स्वराज्य कंपनीचे ट्रॅक्टर ाह २३ लल ५२६५ तर दुसरीही याच कंपनीचे ट्रॅक्टर चह २३ री ६१४४ असून विना नंबरच्या ट्रॉली ही चोरटी वाहतूक करताना आठळून आले असून त्यांच्यावर तलवाडा पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे ती कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके यांच्या आदेशानुसार बीट अंमलदार चव्हाण, जिकरे यांनी केले आहे

# सरकारी अभियंता नेमके कोणत्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिकून येतात? - एस.एम.युसूफ

**प्रतिनिधी ।** बीड

शहरात सुरू असलेल्या विकास कामांमध्ये रस्ते निर्माण करताना रस्त्याच्या दोन्ही बाजूने असणारे नाले व नाल्या तयार करताना ते सर्रासपणे सपाट आणि दोन्ही बाजूच्या भिंती सरळ उभ्या करण्यात येत आहे. असे नाले व नाल्यांमधून गलिच्छ पाण्याचा प्रवाह वाहून न जाता थांबून राहतो. यामुळे शहरात गलिच्छता तर वाढतेच शिवाय डासांची उत्पत्ती होऊन मोठ्या प्रमाणात डास निर्माण होतात. मात्र याकडे ना बीड नगर परिषद लक्ष देते, ना जिल्हा प्रशासन. म्हणून सरकारी अभियंता नेमके कोणत्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिकून येतात? असा उद्विग्न प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून उपस्थित केला आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे की, बीड शहरातील नगर नाका ते राजीव गांधी चौकापर्यंतच्या कॅनॉल रोडवर मोठ्या नाल्याचे काम प्रगतीपथावर आहे. असे मोठे नाले बनविताना त्यांना एका बाजूने चढ व दुसऱ्या बाजूने उतार राहणे अपेक्षित असते. शिवाय नाल्याच्या दोन्ही बाजूकडील भिंती सरळ रेषेत न बांधता त्या थोड्याशा तिरप्या रेषेत बांधणे आवश्यक असते. जसे पाटबंधारे विभाग बंधारे बांधताना बंधाऱ्यांच्या दोन्ही बाजूच्या भिंती तिरप्या रेषेत बांधतात. मोठ्या नाल्यांना सुद्धा अशाच प्रकारच्या भिंती बांधणे आवश्यक असताना सरकारी काम करणारे अभियंता मात्र मोठ्या नाल्यांना ना चढ देतात ना उतार देतात. दोन्ही बाजूच्या भिंती तिरप्या रेषेत न बांधता सरळ बांधून टाकतात. अशा सदोष नाले बांधणीमुळे नाल्यात पाणी वाहते न राहता तुंबून राहते. यात मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होऊन डासांचा सुळसुळाट होतो, गलिच्छ पाणी तुंबून राहिल्याने दुर्गंधी सुटते. पर्यायाने लोकांना त्याचा खूप त्रास होतो. या बाबीकडे बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनाचेही साफ दुर्लक्ष असल्याचे दिसून येते. बीड शहरात अशा प्रकारे सदोष बांधकाम सरकारी अभियंत्यांकडून सर्रासपणे करण्यात येत असल्याने सरकारी अभियंता नेमके कोणत्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून शिकून येतात? असा उद्विग्न प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकातून उपस्थित केला असून याकडे बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनाने ही लक्ष द्यावे



# कलाविष्कार आणि सन्मानाने भारावला स्नेहसंमेलन सोहळा

**प्रतिनिधी ।** बीड

दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी श्री बंकटस्वामी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा सोहळा उत्साहाने गाजला. विद्यार्थ्यांच्या बहुरंगी कलाविष्काराने आणि गुणवंतांच्या सन्मानाने संपूर्ण महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व श्री बंकटस्वामी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी सुप्रसिद्ध स्टँडअप कॉमेडीयन कु.अंकुर तांगडे यांच्या उपस्थितीत उद्घाटन संपन्न झाले. उद्घाटनानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.शिवाजी मोरे यांनी केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले, तसेच वर्षभर महाविद्यालयात वेगवेगळ्या विभागाने उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कार्याचा याप्रसंगी गौरवोद्गार केला आणि उत्कृष्ट काम केलेल्या कामाची प्रशंसादेखील या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी केली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षक स्टँडअप कॉमेडियन कु.अंकुर तांगडे यांनी तरुणाई मध्ये अत्यंत जोशपूर्ण असे मार्गदर्शन केले, तसेच महाविद्यालयीन तरुणांना मनोरंजना बरोबरच आपले ध्येय निश्चित करून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा नावलौकिक व गुरुजनांचा आदर कसा वाढेल या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाला दिशा दिली पाहिजे असे मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी नृत्य,गायन,नाट्य आणि विविध कलाकृतींमधून आपली प्रतिभा सादर केली. विशेष आकर्षण ठरलेली राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर अत्यंत जोश पूर्ण नृत्य सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.




कार्यक्रमाच्या शेवटी शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. या प्रमाणपत्र वितरण व गुणगौरव समितीचे प्रमुख डॉ.शंकर धांडे यांनी याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या विविध गुणगौरवावर केलेल्या कामाबद्दल माहिती देत प्रमाणपत्र वितरण मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते असे सांगितले.एकूणच, स्नेहसंमेलनाच्या या रंगतदार सोहळ्याने महाविद्यालयीन जीवनातील अविस्मरणीय आठवणी तयार केल्या. या दोन दिवशी वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये आनंद नगरी, शेलापागोटे तसेच विविध मनोरंजनाचे तसेच खाद्याचे स्टॉल द्वारे महाविद्यालय परिसर अत्यंत गजबजून गेला होता. या प्रसंगी शेलापागोटे हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या अत्यंत आवडीचा आणि मनोरंजनाचा असतो या शेलापागोटेचे वाचन प्रा.डॉ.महादेव जगताप,डॉ. राजीव काळे, प्रा.सोट सर प्रा.सौ.छाया सोंडगे, प्रा.नितीन चव्हाण यांनी आपल्या विनोदी शैलीत वाचन करून या कार्यक्रमाची रंगत वाढविली. वार्षिक स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचलन डॉ.प्रकाश कोंका व डॉ. दीपमाला माने यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.ब्रम्हनाथ मेंगडे यांनी मानले यानंतर महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले. दोन दिवसीय स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील विविध समित्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले व स्नेहसंमेलन यशस्वी केले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# वंचित समुहाच्या हक्कासाठी भव्य निदर्शनात सामील व्हा - वंचित बहुजन आघाडीचे आवाहन

**प्रतिनिधी ।** बीड

वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने वंचित समूहाच्या विविध मागण्यासाठी भव्य निदर्शने जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आयोजित करण्यात आले असुन हजारोच्या संख्येंने सामील होण्याचे आवाहन करण्यात आले आहे . व्यैयक्तिक लाभासाठी ग्रामसभेच्या ठरावाची अट रद्द करावी बीड जिल्ह्यामध्ये ओटीएसपी, विशेष घटक योजना, अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना वेगवेगळ्या योजनेचा लाभ दिला जातो यासाठी ग्रामसभेच्या ठरावाची अट बंधनकारक केलेली आहे सदरील अट रद्द करावी, रमाई आवास योजना ग्रामीणच्या अनुदानामध्ये ५ लाख पर्यंत वाढ करण्यात यावी या मागणीसाठी येत्या १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष मा.अजय सरवदे यांच्या नेतृत्वाखाली, जिल्हा पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे वंचित बहुजन आघाडी बीडच्या वतीने भव्य निदर्शने करत आंदोलन करण्यात येणार आहे . तरी सर्व बीड जिल्हा पदाधिकारी, युवक आघाडी पदाधिकारी, महिला आघाडी पदाधिकारी, शहर पदाधिकारी, सम्यक विद्यार्थी आंदोलन पदाधिकारी, वंचित बहुजन आघाडी माथाडी कामगार पदाधिकारी व सर्वच वंचित बहुजन आघाडीच्या विंगच्या आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे बीड तालुकाध्यक्ष किरण वाघमारे व शहराध्यक्ष लखन जोगदंड यांनी प्रसिद्धी पत्रकातुन केले आहे .

# नाशिकमध्ये जागतिक कृषी महोत्सवाचे ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते थाटात उद्‌घाटन

## लोकनेते मुंडे साहेबांच्या गुणांचा वारसा स्वीकारून लोक माझ्याशी जोडले गेले

**प्रतिनिधी ।** नाशिक

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या खुप मोठी आहे; त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांचा जर आपण एक साठा केला तर एक वेगळा पक्षच उभा राहील इतकी मोठी ताकद त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांमध्ये आहे. लोक मुंडे साहेबांच्या गुणांवर प्रेम करतात, त्यामुळे गुणांचा वारसा स्विकारुन ते माझ्याशी जोडले गेले अशा शब्दात राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशूसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

श्री स्वामी समर्थ कृषी विकास आणि संशोधन चॅरीटेबल ट्रस्ट, दिंडोरी आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक कृषी महोत्सवाचे उद्घाटन आज ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी शेतकरी बांधवांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या. धुळ्याच्या खासदार शोभाताई बच्छाव, आ. सिमाताई हिरे, अण्णासाहेब मोरे, लक्ष्मण सावजी आदी यावेळी



## पर्यावरण रक्षणासोबतच नद्या पुनर्जीवित करणे गरजेचे

उपस्थित होते.

यावेळी बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, मुंडे साहेबांनी भारतीय जनता पक्षाच्या जन्मापासुन काम केले आणि तो पक्ष खऱ्या अर्थाने त्यांनीच उभा केला. महाराष्ट्रात भाजप रुजविण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या खुप मोठी आहे. एवढे प्रेम करणाऱ्या लोकांचा जर आपण एक साठा केला तर एक वेगळा पक्षच उभा राहील एवढं प्रेम लोकं त्यांच्यावर करतात.

नद्या पुनर्जीवित करणे गरजेचे

शहरीकरण आणि नागरीकरण वाढत असताना, पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन होणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि नद्या पुनर्जीवित करीत पर्यावरण संवर्धनासाठी सामुहीक प्रयत्नांची आवश्यकता असल्याचे त्या यावेळी म्हणाल्या.

वारकरी भवन चे लोकार्पण

श्रीक्षेत्र संत शक्तीधाम देवस्थान, येथे सुसज्ज व सर्व सुविधांनी परिपूर्ण वारकरी बांधवांसाठी साकारलेल्या नाशिक जिल्ह्यातील पहिल्या 'वारकरी भवन' चे लोकार्पण ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते झाले. हा सोहळा वारकरी बांधवांच्या सेवेसाठी नवी दिशा ठरणार असून भाविकांसाठी ही एक ऐतिहासिक आणि आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे असं त्या यावेळी म्हणाल्या. या सोहळ्यास अमृतधाम स्वामी महाराज, भाजपा आमदार सीमाताई हिरे, गुरूमाऊली अण्णासाहेब मोरे, गोविंद घुगे, कावेरीताई घुगे आदी उपस्थित होते.

# जिद्द, चिकाटी व मेहनत केल्यास यश निश्चित प्राप्त होत - ,शिवसेना तालुकाप्रमुख गोरख सिंघन



प्रतिनिधी । बीड

आज कोल्हारवाडी ता.बीड येथे मुंबई पोलिस दलात ऋषिकेश सुभाष जाधव,संजय संभाजी जाधव व अमोल अंकुश म्हस्के यांची निवड झाल्याबद्दल तसेच धाराशिव जि.प.मधये कु.मनिषा रामचंद्र वीर व बीड जि.प. मध्ये स्वाती उर्फ सोनू जाधव / बेंगडे व बीड येथील शासकीय रुग्णालयात माधुरी विक्रम रांजवण यांची निवड झाल्याबद्दल या सर्वांचा शिवसेनेचे तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या वतीने भव्य सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता,या सर्व विजयी मुलामुलींची गावातून हलकी पथकाच्या जोरदार आवाजात भव्य मिरवणूक काढण्यात आली काढण्यात आली , यावेळी सर्व गावातील पुरुष, महिला, युवक व आबालवृद्ध मोठ्या संख्येने सामील झाले होते, सर्वत्र आनंदीआनंद संचारला होता.गावात जत्रेचे स्वरूप आले होते यावेळी बोलताना गोरख अण्णा म्हणाले की ,आपल कोल्हारवाडी हे ऊसतोडणी कामगाराचे गाव ,दुधविकणाराच गाव हि जुनी ओळख आहे पण आता आपल्या गावात नवनवीन व्यवसायात तरुण उतरत आहेत व विविध क्षेत्रात तरुण शासकीय सेवेत रूजू होत आहेत , तसेच मुलीसुद्धा आता मागे नाहीत विविध शासकीय सेवेत मुलींनीही भरारी घेतली आहे म्हणून येणाऱ्या काळात आपली जुनी ओळख पुसून आता नवीन प्रगतशील कोल्हारवाडी व नोकरदारांची कोल्हारवाडी अशी ओळख आपल्याला तयार करायची आहे त्यासाठी तरुण तरुणींनी आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी कष्ट व मेहनत करावी व आपल्या आईवडिलांनची स्वप्न साकार करण्यासाठी जिद्द व चिकाटी यांचा अंगीकार करावा असे आवाहन केले यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. सखाराम महाराज जाधव ,नवनाथराव हजारे ,माजी सरपंच दशरथ धर्मे , रामचंद्र वीर , लक्ष्मण भोसले ,उपसरपंच अशोक सिंघन , गहिनीनाथ जाधव यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाला गावातील पुरुष व महिला मंडळी व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा नेते ज्ञानेश्वर सिंघन, विश्वजीत जाधव, सचिन बेंगडे , राजेंद्र भोसले , ओमराजे सिंघन यांच्यासह गावातील युवकांनी खूप मेहनत घेतली..

# शिवजन्मोत्सव सोहळ्यात यावर्षी शिवशाही महानाट्याचे आयोजन -आ. विजयसिंह पंडित

प्रतिनिधी । गेवराई

आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सालाबादाप्रमाणे यावर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे थाटात आयोजन करण्यात येत असून यावर्षी शिवजन्मोत्सव सोहळ्यात सुप्रसिद्ध ऐतिहासिक महानाट्याचे लेखक महेंद्र महाडिक दिग्दर्शित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी पत्रकार परिषदेत दिली.

शिवजन्म शिवजन्मोत्सव सोहळ्याची माहिती देताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की २०१४ पासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन केले जाते. वर्गणी आणि डीजे मुक्त वातावरणात हा शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला जातो. यापूर्वी शिवगर्जना, शिवपुत्र संभाजी, राजा शिवछत्रपती या महानाट्याचे आयोजन करण्यात आले व त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य शिवशाही चे आयोजन करण्यात आलेले आहे. या नाटकांमध्ये राजमाता जिजाऊ म्हणून सिनेतारका अलका कुबल, छत्रपती शिवाजी महाराज सिने कलावंत शंतनू मोघे, हंबीरराव मोहिते नाट्य अभिनेते प्रकाश धोत्रे, कागा भट्ट महेश कोकाटे, संत तुकाराम महाराज रमेश रोकडे, बाजीप्रभू देशपांडे राजेश आहेर, हे भूमिका सादर करणार असून यात २५० सहभागी कलाकार सहभागी होणार आहेत. सुप्रसिद्ध लेखक तथा नाट्यनिर्माते महेंद्र महाडिक दिग्दर्शित शिवशाही या महानट्याचे ५५ फुटाचा हायड्रोलिक सेट हे वैशिष्ट्य आहे. शिवजयंतीच्या दिनी शुभारंभाचा मुख्य शो १९ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थित होणार असून हा शो सर्वांसाठी विनामूल्य आणि खुला आहे. २० फेब्रुवारी रोजी फक्त महिलांसाठी तर २१ फेब्रुवारी रोजी फक्त विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला आहे. प्रेक्षकांसाठी खुर्च्यांची बैठक व्यवस्था करण्यात येणार असून शिवशाही महानाट्य व शिवजन्मोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत असलेल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य शिवशाही साठी नाट्यमंच आणि मंडप उभारणी कामांचा भव्य शुभारंभ आज शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजक आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी




जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे , आप्पासाहेब गव्हाणे, सुभाषराव मस्के, जालिंदर पिसाळ, नगरसेवक शाम येवले, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, सरपंच शितल साखरे, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, सहकार्याध्यक्ष संदिप मडके, सहकार्याध्यक्ष संतोष सुतार, उपाध्यक्ष अँड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल, सचिव राहुल मस्के, सहसचिव शहादेव निकम, कोषाध्यक्ष पप्पू पठाण, सह कोषाध्य रणजित घुंबार्डे, कार्यकारणी सदस्य प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेंद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मानवी समाजातील कोण्या एका विसंवादी जोडप्यास अनावृत्त पत्र

## मानवी समाजातील कोण्या एका विसंवादी जोडप्यास कवी नंदीचा स.न.वि.वि.

प्रतिनिधी । बीड

पत्र लिहण्यास कारण की चार भिंतीतील भांडण असं चव्हाटयावर आलं की आमच्यासारख्या समाजातील काही विघ्नसंतोषी लोकांना बरं वाटतं .तसं वाटणंही सहाजीकच आहे . मानवी स्वभाव मुळातच स्वतः च ठेवावं झाकून दुसऱ्याच पहावं वाकून ह्या प्रवृत्तीचा असतो. त्याला स्वतः च्या डोळ्यातलं मुसळ दिसत नाही अन् तो दुसऱ्याच्या डोळ्यातलं कुसळ पहाण्याचा अटोकात प्रयत्न करत असतो.बरं असो मुख्य पत्र लिहण्याचा विषय असा की बरेच दिवसापासून तुमच्या दोघांतील ठिणग्या दिवाळीतील रॉकेटसारख्या आमच्या घरावर वारंवार आदळत आहे .आज फारच असह्य झालं म्हणून तुम्हां दोघांना समजवण्याचा लहान तोंडी मोठा घास घेत आहे तरी सर्व बाजूंनी शांत डोके ठेवून तुम्ही दोघांनी विचार करावा अशी तुम्हां दोघांच्या उज्वल संसारीक हितासाठी आशा करतो.

प्रत्येक संसारी माणूस चालत आलेल्या ह्या श्रद्धेवर मनापासून विश्वास ठेवून असतो की कितीही प्रयत्न केले तरीसुद्धा मनासारखा जोडीदार मिळत नसतो . म्हणून तो मनाला आटोकाट समजवण्याचा प्रयत्न करतो की लग्नगाठी ह्या भुतलावर नाही तर स्वर्गात पहिलेच जुळून ठेवलेल्या असतात .तरीसुद्धा नव्याचे नऊ दिवस संपले की सहाजीकच थोड्याफार प्रमाणात लहानसहान कारणांमुळे काही देणंघेणं नसतांना दोघात संवाद कमी झाल्यामुळे किंवा गैरसमजूतीमुळे खटके उडण्यास सुरवात होते .सुरवातीला दोघेही याकडे थोड्याफार प्रमाणात कानाडोळा करतात परंतु पाणी डोक्याच्या वर जायला लागलं की दोन्हीबाजूंकडून मनाला खुपतील असे शब्दप्रयोग जाणूनबुजून वापरण्याचा चढीवर चढी असा प्रकार सहाजीकच दोघेही अमलात आणण्याचा आटोकाट प्रयत्न करतात.

यामुळे दोघांतील विसंवादास सुरूवात होते. यामध्ये दोघांपैकी कोणीही आपली पडकी बाजू घ्यावयास तयार नसतो . शब्दाने शब्द वाढत जातो तेव्हा त्याची कहाणी अख्या गावपर पसरली आहे हे दोघांच्याही वेळेवर लक्षात येत नाही .जेव्हा लक्षात येते तेव्हा आपणच स्वतः हून तिसऱ्याला काही कामधंदा नसतांना दोघांच्या मधात बोलण्याची संधी देतो .त्यामुळं भांडण मिटत तर नाहीच तर त्याच्या गावभर डांगोरा होतो . त्यात जर कोर्टासारखा चौथाच कोणी मध्यस्ती करू पहात असेल तर भांडण न मिटण्याचा विचार केलेलाच बरा .परंतु हे लग्न करून सासरी सुखानं नांदणार्या मुलामुलींच्या आईबापांनी समजून घेतलं पाहिजे .खरंच समजलं असतं तर आज जी काय समाजात घटस्फोटासाठी दोन्हीही पार्टीकडून अरेरावी चालली आहे त्यामुळं सर्वात जास्त मुलीचच नुकसान होते.हे प्रत्येक समजदार पालकांनी समजून घ्यायला पाहिजे .

सर्वप्रथम आपल्या मुलीला किंवा मुलाला भविष्यकाळात येणाऱ्या समस्या आपण उघड्या डोळ्यांनी अनुभवलेल्या समाजातील इतर जोडप्यांचे घटस्फोट झाल्यानंतर त्यांच्या कुटूंबाचे , मुलाबाळांचे हाल पाहिल्यानंतर प्रत्येक समजदार पालकाने दोन पावले मागे सरकून यावर घरातच तोडगा काढला पाहिजे .कोर्ट हे काही यावर उत्तर नाही .वकील हा व्यवसायीक प्राणी आहे .तो अश्या संधीच सोन करायला मागेपुढे पहात नसतो.तरी अतः प्रत्येक जोडप्यांनी व त्यांच्या पालकांनी सावधान.ह्या प्रसंगावर माझी एक कविता आहे .

घटस्फोट

घटस्फोट शब्द ऐकताच आम्ही दोघं घाबरून गेलो ,
अन् मेझॉनच्या मालकान घटस्फोट घेतला ।
धृ । १ ।
अमाप संपत्ती ज्यांच्यासाठी जमवीली ,
ती सर्व त्यावेळी का नाही आठवली ? । २ ।

कितीही कामे असली
आपल्या माणसासाठी सवड नसली ,
अन् मेझॉनच्या मालकाची गाडी घटस्फोटाच्या ट्रेफिकमध्ये फसली । ३ ।
संसारात अपेक्षा केवढी ?
प्रेमाचे दोन शब्द तेवढे ,
अन् मेझॉनच्या मालकान तेवढेच विसरले । ४ ।
प्रत्येक गोष्टीमध्ये तडजोड करता आली पाहिजे ,
अन् मेझॉनच्या मालकाला एवढं सुद्धा कळलं नाही पाहिजे । ५ ।
पैसा सांभाळणं सोपं असतं ,
एकमेकांच मन सांभाळण कळत नसतं ,
अन् मेझॉनचा मालक असून सुद्धा हे प्रत्येकाला जमत नसतं । ६ ।
आयुष्यात पैसाच सर्व काही नसतो ,
अन् मेझॉनचा मालक असून सुद्धा फसतो । ७ ।
सात फेरे मारणं अन् सात वचन घेणं सोपं असतं ,

# धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी कायम : आ. सुरेश धस

प्रतिनिधी । बीड

संतोष देशमुख प्रकरणात आकाच्या आकाच्या राजीनाम्याची आमची मागणी कायम आहे. आता करुणा मुंडे यांनीही राजीनाम्याची मागणी केली आहे. करुणा मुंडे यांच्याकडे पंकजा मुंडेंबाबत काय माहिती आहे, हे त्यांनाच विचारावं लागेल. आमच्याकडील सर्व माहिती आम्ही देतो. ती माय माऊली एकटी राहते, मुलं देखील तिच्यासोबत नाही. आता परळीतील ५०० व्यापारी आणि लोकांनी गाव सोडलं आहे. तिथं अनेक माफिया, राख माफिया, वाळू माफिया आहेत. आकाच्या आकाची पिलावळ आहे, त्यांचा सर्व माज आता जिरणार आहे. काही गोष्टी गोपनीय त्या बोलणं योग्य होणार नाही, अन्यथा तपास स्पॉईल होईल, यासाठी आपण धनंजय देशमुखला समजावणार आहोत. कृष्णा आंधळे हा परराज्यात असणार. ते कोकरू आहे, कुठेही गेला तरी तो सापडेल. आमचा पोलीस आणि गृह विभागावर पूर्ण विश्वास आहे असेही सुरेश धस यांनी सांगितले. ते पत्रकारांशी बोलत होते.

भाजपाचे नेते आमदार सुरेश धस यांनी मस्साजोगचे आमदार संतोष देशमुख निघृण हत्येचे प्रकरण लावून धरले आहे. या प्रकरणात आकाच्या आकाची राजीनाम्याची मागणी आम्ही करतोय आता करुणा मुंडे यांनी देखील राजीनामाची मागणी केली आहे असे सुरेश धस यांनी म्हटले आहे. आता आकाच्या पिलावळीचा त्यांचा सर्व माज आता जिरणार आहे. काही गोष्टी गोपनीय ठेवलेल्या बऱ्या, त्या बोलणं योग्य होणार नाही, त्यामुळे तपास स्पॉइल होईल असेही भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी म्हटले आहे.

परभणीवरुन मुंबईला सोमनाथ सुर्यवंशी यांच्या पोलीस कोठडीतील मृत्यू प्रकरणात दोषी पोलिसांवर कठोर कारवाई आणि कुटुंबियांना आवश्यक असलेली नुकसान भरपाई देण्याची मागणीसाठी निघालेला मोर्चा रद्द करण्यात आला आहे. नाशिक येथे हा मोर्चा आला त्यास परभणीच्या पालक मंत्री अपर्णा बोर्डीकर यांनी सुर्यवंशी कुटुंबियांची भेट घेऊन त्यांना मोर्चा रद्द करण्याची विनंती केली. या प्रकरणात आपण पहिल्या दिवसांपासून



आंदोलकांच्या संपर्कात आहोत. पायी चालणे अत्यंत क्लेशकारक आहे. या प्रकरणात ५ पोलीसांना निलंबित केले आहे.आंदोलकांची १२ पोलीस निलंबित करण्याची मागणी होती. परंतू पोलिसांचं मॉरेल डाऊन होऊ नये म्हणून असे केले नाही. प्रशासनाला दोन्ही बाजूने पाहावं लागतं. यासाठी कारवाई नाही केली. त्यांच्या इतर मागण्यांची पूर्ता एक महिन्यात व्हावी यासाठी आपण मुख्यमंत्र्यांचा कानावर सर्व घातलंय असे यावेळी सुरेश धस यांनी सांगितले. त्यांना पुन्हा आंदोलन करण्याची वेळच येणार नाही असेही ते म्हणाले.

# मणिपूरचे सीएम एन. बिरेन सिंह यांचा राजीनामा

## राज्यात २१ महिन्यांपासून हिंसाचार सुरू

प्रतिनिधी । मनिपुर

मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी रविवारी संध्याकाळी राज्यपालांकडे राजीनामा सादर केला. नवीन मुख्यमंत्र्यांबाबतचा निर्णय एक-दोन दिवसात घेतला जाईल.राज्यात २१ महिन्यांपासून सुरू असलेल्या हिंसाचारामुळे बिरेन सिंह यांच्यावर खूप दबाव होता. विरोधी पक्षही या मुद्द्यावर एनडीएवर सतत प्रश्नचिन्ह उपस्थित करत होते.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यपालांनी त्यांना नुकतेच हंगामी मुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारण्यास सांगितले आहे. मणिपूर निवडणुकीत भाजपच्या विजयानंतर, बिरेन सिंह यांनी केंद्रीय नेतृत्वाला आश्चर्यचकित केले आहे.महिनाभरापूर्वी, बिरेन सिंह यांनी मणिपूर हिंसाचारावर म्हटले होते- मला माफ करा. महिन्याभरापूर्वी, मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह यांनी राज्यातील



हिंसाचार आणि त्यात झालेल्या जीवितहानीबद्दल माफी मागितली होती. बिरेन सिंह म्हणाले होते की, संपूर्ण वर्ष खूप दुर्दैवी होते. मला याबद्दल खूप वाईट वाटते. ३ मे २०२३ पासून आजपर्यंत जे काही घडले आहे, त्याबद्दल मी राज्यातील जनतेची माफी मागतो.

सचिवालयात माध्यमांशी झालेल्या चर्चेदरम्यान मुख्यमंत्री बिरेन सिंह म्हणाले की, अनेक लोकांनी त्यांचे प्रियजन गमावले आहेत. अनेक लोक आपली घरे सोडून गेले. मला खरोखर वाईट वाटते. मला माफी मागायची आहे.३ मे २०२३ पासून मणिपूरमध्ये कुकी-मैतेई समुदायातील हिंसाचार सुरू आहे. मैतेई-कुकी समुदायात हिंसाचार सुरू होऊन ६०० हून अधिक दिवस उलटून गेले आहेत.बिरेन सिंह म्हणाले, 'मणिपूरमध्ये मे २०२३ ते ऑक्टोबर २०२३ पर्यंत गोळीबाराच्या ४०८ घटनांची नोंद झाली. नोव्हेंबर २०२३ ते एप्रिल २०२४ पर्यंत ३४५ कार्यक्रम झाले. मे २०२४ पासून ११२ घटनांची नोंद झाली आहे.तथापि, गेल्या महिन्यापासून राज्यात शांतता आहे. हिंसाचाराची कोणतीही घटना घडली नाही. तुरळक निदर्शने झाली

# वाहनधारकांनो, ३१ मार्चपूर्वी वाहनाची नंबर प्लेट बदलून घ्या

प्रतिनिधी । मुंबई

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ आणि केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्रालयाच्या नियमानुसार १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना ' हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट' बसवण्याची तरतूद आहे.यामुळे वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर



धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे शक्य होणार आहे. ३१ मार्चपूर्वी सर्व वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर बसवण्याची मुदत असून त्यानंतर जी वाहने ही नंबर प्लेट बसवणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी उत्पादित झालेल्या जुन्या नोंदणीकृत वाहनांना ही नंबर प्लेट बसविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार मुंबई मध्य प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व वाहनधारकांनी त्यांच्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातूनही सर्व वाहनांना ही नंबर प्लेट बसविणे अत्यावश्यक असून १ एप्रिल २०१९ पुर्वीच्या जुन्या वाहनांनाही हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.



# शरिरावर घाव, तोंड कपड्याने बांधलेलं

## बीडमध्ये मृतदेह सापडल्याने खळबळ

प्रतिनिधी । बीड

मागच्या काही दिवसांपासून गुन्ह्यांच्या घटनामुळे चर्चेत आलेल्या बीडमध्ये मृतदेह सापडल्यामुळे खळबळ माजली आहे. बीडच्या मांजरसुंबा येथे राष्ट्रीय महामार्गालगत एक मृतदेह सापडला आहे.या मृतदेहाच्या शरिरावर जखमा आहेत, तसंच तोंडही बांधलेलं आहे. हत्या करून हा मृतदेह रस्त्यावर टाकून दिल्याचा संशय पोलिसांना आहे.

बीड तालुक्यातील मांजरसुंबा परिसरात एका ट्रक चालकाचा मृतदेह आढळला आहे. धुळे-सोलापूर महामार्गालगत एका शेतात कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथील मोहम्मद सलीम या ५५ वर्षांच्या ट्रक चालकाचा मृतदेह आढळला. या मृतदेहाच्या शरिरावर मोठे घाव आहेत,

# सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला आ.संदीप क्षीरसागर आले धावून!

## हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढ द्यावी

प्रतिनिधी । बीड

बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऐनवेळी आ.संदीप क्षीरसागर धावून आले आहेत. मतदारसंघासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या खरेदीसाठी नाफेडकडे नावनोंदणी केली, मात्र मुदत संपल्यानंतर आता ही खरेदी कधी होणार? असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असून शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढी द्यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पणण मंत्री जयकुमार रावल व राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे. याबाबत लेखी पत्रही आ.क्षीरसागर यांनी दिले आहे.

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर अन् त्यांच्या संवादातून लक्षात आलेल्या समस्या लक्षात घेवून आ.संदीप क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या भावना पत्र लिहून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यापर्यंत पोहचवल्या आहेत. हंगाम २०२४-२५ मधील हमीभावाने सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिल्यास सर्व शेतकऱ्यांकडील सोयाबीन खरेदी होवू शकते याकडे लक्ष वेधत आ.संदीप क्षीरसागर यांनी याबाबतच्या पत्रात नमूद केले आहे की, केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भीय धोरणानुसार सुरूवातीला दि.३१ जानेवारी २०२५ पर्यंत त्यानंतर दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सोयाबीन खरेदीच्या बाबतीत मुदतवाढ देण्यात आली होती; परंतु बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील नोंदणीधारक शेतकरी ४४ हजार ७०० च्या वर आहेत. त्यापैकी दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत



किमान २१ हजार शेतकरी बांधवांककडून सोयाबीन खरेदी झालेली आहे.

बीड मतदार संघासह जिल्ह्यातील किमान ४० टक्क्याच्यावर शेतकरी बांधवांची खरेदी अजूनही शिल्लक आहे. त्यामुळेच या सर्व शेतकरी बांधवांच्या सोयाबीनची खरेदी करण्यासाठी मुदतवाढ द्यावी व त्यातून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी महत्वाची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. निवेदनातच्या प्रती राज्याचे मुख्य सचिव व अवर सचिवांनाही पाठवण्यात आल्या आहेत. आ.संदीप क्षीरसागर यांनी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न राज्य शासनापर्यंत पोहचवले आहेत. आता शासनाकडून मुदतवाढीचा निर्णय कधी होतो याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT